# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 04.10.2026** **वार : रविवार**

---

## ठळक बातम्या

1. लोकसभा अध्यक्षांकडून, विविध मंत्रालयांशी संबंधित संसदीय समित्यांची पुनर्रचना.
2. मराठीसह पाच अभिजात भाषांच्या अभ्यासासाठी उत्कृष्टता केंद्रांच्या स्थापनेला शिक्षण मंत्रालयाची मंजुरी.
3. आगामी प्रवासी भारतीय दिवस परिषद कोलकाता इथं येत्या 7 जानेवारीपासून होणार.
4. पाकिस्तानातून होणाऱ्या अवैध घुसखोरीचा भारताकडून तीव्र निषेध.
5. आशियाई क्रीडा स्पर्धांची आज सांगता; 85 पदकांची कमाई करत भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर.

## सविस्तर बातम्या

### समित्यांची पुनर्रचना

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विविध मंत्रालयांशी संबंधित अनेक संसदीय समित्यांची पुनर्रचना केली आहे. भाजप खासदार भर्तृहरी महताब यांची वित्त समितीच्या तर काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांची,परराष्ट्र व्यवहार समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपचे खासदार सुधीर गुप्ता यांची रेल्वे समितीच्या तर डॉ. काकोली घोष दस्तीदार, यांची नियुक्ती रसायने आणि खतं समितीच्या अध्यक्षपदी करण्यात आली आहे. काँग्रेसचे खासदार चरणजित सिंग चन्नी हे कृषी,पशुसंवर्धन आणि अन्न प्रक्रिया समितीचे अध्यक्ष असतील. भाजपचे खासदार राधा मोहन सिंग संरक्षण; तर राजीव प्रताप रुडी जलसंपदा समितीचे अध्यक्ष असतील. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांची दूरसंवाद आणि माहिती तंत्रज्ञान समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून ग्रामीण विकास आणि पंचायत राज समितीच नेतृत्व काँग्रेसचे खासदार सप्तगिरी उलाका करतील. या समित्यांचा कार्यकाळ सप्टेंबर महिन्याच्या 26 तारखेपासून लागू होईल.

### 'कौटिल्य इकॉनॉमिक कॉन्क्लेव्ह'

गेल्या दशकात आर्थिक शिस्त, पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, बँकिंग क्षेत्रातील सुधारणा, यांच्या एकत्रित प्रयत्नांतून भारताची आर्थिक ताकद निर्माण झाली असल्याचं प्रतिपादन अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. नवी दिल्ली येथे आयोजित पाचव्या 'कौटिल्य इकॉनॉमिक कॉन्क्लेव्ह'ला संबोधित करताना त्या काल बोलत होत्या. सरकारने जीएसटी, दिवाळखोरी आणि नादारी संहिता तसेच चार कामगार संहितांच्या माध्यमातून राष्ट्रीय कार्यप्रणाली अधिक सक्षम केली आहे. भारताने गेल्या चार वर्षांतील विविध आव्हानांचा यशस्वीपणे सामना केला असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

### उत्कृष्टता केंद्र-मंजुरी

केंद्रीय शिक्षण मंत्रालयान अभिजात भाषांच्या अभ्यासासाठी 5 उत्कृष्टता केंद्रांना मंजुरी दिली आहे. मराठीसह आसामी, बंगाली, पाली, आणि प्राकृत या भाषांच्या अभ्यासासाठी ही 5 उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळ प्रगत

शैक्षणिक संशोधन, भाषिक आणि  साहित्यिक वारशाच जतन तसंच डिजिटलायझेशन आणि या भाषांशी संबंधित ज्ञानाचा व्यापक प्रसार करण्यासाठी विशेष संस्थात्मक आधार मिळेल.

ही उत्कृष्टता केंद्रे आसाममधील तेजपूर विद्यापीठ, पश्चिम बंगालमधील विश्व-भारती विद्यापीठ, पुण्यातील डेक्कन कॉलेज, ओडिशाच केंद्रीय विद्यापीठ आणि गुजरातचे केंद्रीय विद्यापीठ इथं स्थापन केली जातील.
या केंद्रांची स्थापना ही भारतातील अभिजात भाषांचा अभ्यास, संशोधन आणि जतन यांच्यासाठी संस्थात्मक परिसंस्था बळकट करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**'प्रवासी भारतीय दिवस'**

19वी प्रवासी भारतीय दिवस परिषद पुढील वर्षी 7 ते 9 जानेवारी दरम्यान पश्चिम बंगालमधील कोलकाता इथं होणार आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि पश्चिम बंगाल सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित केली जाणार आहे. महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून 9 जानेवारी 1915 रोजी भारतात परतले होते, या घटनेच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रवासी भारतीय दिवस साजरा केला जातो.

या अधिवेशनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कार प्रदान केले जाणार असून त्या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील.
या कार्यक्रमात जगभरातील भारतीय वंशाचे नागरिक, युवा नेते, उद्योजक, व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ, नवोन्मेषक आणि इतर संबंधित घटक एकत्र येतील. असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितल आहे.

**राजीव-गौबा**

वेगानं बदलणाऱ्या भू-राजकीय,तांत्रिक आणि आर्थिक परिस्थितीनुसार नियामक चौकटींमध्येही आवश्यक ते बदल करण्याची गरज नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांनी व्यक्त केली आहे.नवी दिल्ली इथं काल झालेल्या आर्थिक परिषदेला संबोधित करतांना त्यांनी हे मत व्यक्त केलं. जोखीम नियंत्रित करतांना नवोन्मेष,स्पर्धा आणि गुंतवणुकीला चालना देणारी प्रभावी नियामक व्यवस्था विकसित करणं हे धोरणकर्त्यांसमोरील आव्हान आहे, असं गौबा यांनी नमूद केलं.

**घुसखोरी निषेध**

पाकिस्तानमधून बेकायदेशीर सीमापार घुसखोरीला सतत मिळणाऱ्या पाठिंब्याबद्दल भारताने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तान उच्चायुक्तालयाच्या कार्यवाहक प्रमुखांना बोलावून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. पाकिस्तानातून तीन व्यक्तींनी भारतीय हद्दीत घुसखोरी केल्यानंतर भारतीय सीमा सुरक्षा दलाने त्यांना परत जाण्याबाबत सूचना देऊनही त्यांनी त्याचं पालन केलं नाही; त्यामुळे सीमा सुरक्षा दलानं त्यांच्यावर कारवाई केली; या सीमापार घुसखोरीची, अमली पदार्थांच्या तस्करीची आणि यात पाकिस्तानी सीमा सुरक्षा दलांच्या सहभागाची चौकशी करून योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असं या पाकिस्तानी अधिकाऱ्याला सांगण्यात आलं आहे.

**नेतन्याहू**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांना इस्रायलच्या आगामी स्वातंत्र्यदिन सोहळ्यात औपचारिक ज्योत प्रज्वलित करण्यासाठी आमंत्रित केलं आहे.

नेतन्याहू यांनी मच्छार यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. मच्छार यांनी हवाई हल्ला हाणून पाडल्याबद्दल त्यांच्या शौर्याचं त्यांनी कौतुक केलं. भारत, इस्रायल आणि संपूर्ण जगासाठी मच्छार हे नायक असल्याचे गौरवोद्गार नेतन्याहू यांनी काढले. कॅप्टन मच्छार यांच्या तब्येतीत लवकर सुधारणा व्हावी अशी कामना त्यांनी व्यक्त केली.

**भारतीय पायलट**

अमेरिकेचे उपपरराष्ट्रमंत्री क्रिस्टोफर लँडाऊ यांनीही भारतीय वैमानिक स्मित मच्छार आणि इतरांच्या शौर्याची प्रशंसा केली आहे. फ्लाय दुबईच्या विमानात सह वैमानिकानं दहशतवादी कृत्य करण्याचा प्रयत्न केल्याचं युएईच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे, त्यानंतर अमेरिकेनं ही प्रतिक्रिया नोंदवली.

**<u>सीबीआय-आर्थिक फसवणुक</u>**

केंद्रीय अन्वेषण विभागाने रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या दोन माजी अधिकाऱ्यांविरुद्ध आणि लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात भारतीय आयुरवीम च्या एका माजी अधिकाऱ्याविरुद्ध तीन हजार सातशे 50 कोटी रुपयांच्या कथित आर्थिक फसवणुकी प्रकरणात आरोपपत्र दाखल केले आहे. हे प्रकरण या तीन माजी अधिकाऱ्यांशी संबंधित कथित आर्थिक अनियमिततेशी निगडित आहे.

**<u>महा-बँक फसवणूक प्रकरण</u>**

दरम्यान पंजाब नॅशनल बँकेची 94 कोटी रुपयांची कथित फसवणूक केल्याप्रकरणी, मुंबईतल्या हंजर बायोटेक एनर्जीज प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक आणि हमीदार यांच्या विरुद्धही केंद्रीय अन्वेषण विभागाने गुन्हा दाखल केला असून तपास यंत्रणेन गुरुवारी मुंबईत कंपनीच्या संचालकांशी संबंधित विविध ठिकाणांवर छापे टाकले.

**<u>आशियाई क्रीडा स्पर्धा</u>**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं काल पाच सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य पदके जिंकली. या दमदार कामगिरीमुळे, एकूण पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर पोहोचला असून देशाची एकूण पदकांची संख्या 85 वर पोहोचली असून, त्यात 21 सुवर्ण, 27 रौप्य आणि 37 कांस्य पदकांचा समावेश आहे.

काल **हॉकी**मध्येभारताने मलेशियाचा 5-1 असा पराभव करत पुरुषांच्या गटातील सुवर्णपदकासह दोन हजार 28च्या लॉस एंजेलिस, ऑलिम्पिकसाठी थेट पात्रताही निश्चित केली.

निशिन इथं झालेल्या पुरुषांच्या मर्यादित 20 षटकांच्या **क्रिकेट**मध्येअंतिम सामन्यात भारतानं पाकिस्तानचा 19 धावांनी पराभव करून सुवर्णपदक जिंकल.भारतीय संघानं 6 गड्यांच्या बदल्यात 211 धावा केल्या. अभिषेक शर्मानं 28 चेंडूत 61 धावा केल्या. भारतानं सलग दुसर्यांदा हे सुवर्णपदक पटकावलं आहे.

**कुस्ती**पटू अमन सेहरावतने पुरुषांच्या 57 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले; त्याने अटीतटीच्या अंतिम सामन्यात उत्तर कोरियाचा जागतिक विजेता चोंग सोंग हान याचा 11-7 असा पराभव केला.
महिलांच्या **रिकर्व्ह तिरंदाजी** प्रकारात कुमकुम मोहोडने वैयक्तिक सुवर्णपदक जिंकले.

**गोल्फ**मध्ये, प्रणवी उर्स महिलांच्या वैयक्तिक गटात आशियाई क्रीडा स्पर्धेचे सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली.

**कुस्ती**पटू अंतिम पंघालने महिलांच्या 53 किलो वजनी गटात रौप्यपदक निश्चित केले.

दीपक पुनियाने पुरुषांच्या 97 किलो फ्रीस्टाईल **कुस्ती** प्रकारात मंगोलियाच्या गंखुयाग गनबातारचा पराभव करून कांस्यपदक जिंकले.

**तिरंदाज** नीरज चौहानला पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात कांस्यपदक मिळाले.

दरम्यान दोन आठवड्यांहून अधिक काळ चाललेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा 2026ची आज सांगता होत असून, या स्पर्धेचा समारोप सोहळा जपानमधील नागोया शहरात, मिझुहो पार्क ॲथलेटिकस्टेडियमइथं होणार असून समारोप सोहळा भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी 6 वाजता सुरू होणार आहे.

समारोप सोहळ्यासाठी भारताची ध्वजवाहक म्हणून नेमबाज नीरू धांडा यांची निवड निश्चित करण्यात आली आहे.

**क्रिकेट**

चंदिगड इथं काल झालेल्या पुरुषांच्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडीजनं भारताचा ५ गडी राखून पराभव केला. भारतानं प्रथम फलंदाजी करत 352 धावांचं लक्ष पाहुण्या संघासमोर ठेवलं. हे लक्ष वेस्ट इंडीज संघानं 48 षटकं आणि 2 चेंडूत पूर्ण केलं.

**हवामान**

पुढील दोन दिवसांत मराठवाडा आणि विदर्भातील उर्वरित भाग, तसेच छत्तीसगड, तेलंगणा आणि  कर्नाटकच्या काही भागांतून नैऋत्य मान्सून माघारी फिरण्यासाठी परिस्थिती अनुकूल होण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. आज केरळ, तामिळनाडू, आणि पुद्दुचेरीमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण आणि गोव्यामध्ये उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.